Publication. Punyanagari
Date: 15/2/2019
Page: 1
Column: 1

पुण्य नगरी

शुक्रवार
१५ फेब्रुवारी २०१९

# अदानी इलेक्ट्रिसिटीचा इलेक्ट्रिक स्माईल उपक्रम

**मुंबई** : अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने कॅशलेस पेमेंटना चालना देण्यासाठी 'इलेक्ट्रिक स्माईल' या उपक्रमाची घोषणा केली. धनादेश, वेबसाईट, मोबाईल ॲप आणि इतर ऑनलाईन पेमेंट या पर्यायांच्या माध्यमातून बिलांचा भरणा करणाऱ्या ग्राहकांना इलेक्ट्रिक स्माईल रिवॉर्डनुसार खास ऑफर आणि सवलत मिळेल. प्रत्येक इलेक्ट्रिक स्माईलचे मूल्य एक रुपया असून चेक पेमेंट केल्यास दर १०० रुपयांमागे २ इलेक्ट्रिक स्माईल्स तर ऑनलाईन पेमेंट केल्यास ३ स्माईल्स मिळणार आहेत. तर बिल कागदावर तयार होण्यापूर्वी म्हणजेच मेसेज मिळाल्यानंतर ७ दिवसांच्या आत बिलाचा ऑनलाईन भरणा करणाऱ्या ग्राहकांना १०० रुपयांमागे ४ स्माईल्स मिळणार असून फूड, होम फर्निशिंग, कपडे, ॲक्सेसरीज या खरेदीसाठी खास ऑफर्स आणि डिस्काउंट मिळणार आहेत.